| MHTH030138282023 | | |
|---|---|---|
| | दाखल तारीख | : २५.०४.२०२३ |
| | नोंद तारीख | : २५.०४.२०२३ |
| | निकाल तारीख | : ०४.०७.२०२६ |
| | कालावधी | : ०३व. ०२म. ०९दि. |

**ठाणे येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.५) यांचे न्यायालयात,**

( पिठासीन अधिकारी जी.एम. गुंठे )

**नि.फौ.ख.क्र.१४३४/२०२३** **निशाणी क्र.१६**

**(गु.र.क्र.६२७/२०२२ कळवा पोलिस ठाणे, ठाणे.)**

**भाग "अ"**

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत – पोलीस ठाणे अंमलदार,<br>पोलीस ठाणे कळवा, ता. जि. ठाणे. |
| अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ | | श्री. डी.के. गायकवाड |
| | | ***विरुध्द*** |
| आरोपी | | **१. साकीरअली रज्जबअली खान,**<br>वय – ५८, व्यवसाय – स्वयंपाकी,<br>**२. असगर साकीरअली खान,**<br>वय – २४, व्यवसाय – स्वयंपाकी,<br>रा.मशिदवाली गल्ली, जयभिमनगर नं.०२, कळवा, ठाणे. |

| | | |
|---|---|---|
| आरोपींतर्फे विधिज्ञ | | – श्री. टी.बी. भालेराव. |

## भाग "ब"

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २९.११.२०२२ |
| गुन्हा दाखल दिनांक | ३०.११.२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | २३.०४.२०२३ |
| दोषारोप तयार केल्याचा दिनांक | ०९.०२.२०२६ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | २०.०६.२०२६ |
| न्यायनिर्णयास ठेवल्याचा दिनांक | ०४.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०४.०७.२०२६ |
| दोषी ठरल्याचा दिनांक, जर असल्यास | – |

## आरोपींची सविस्तर माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | साकीरअली रज्ज़बअली खान | ३०.११.२०२२ | ०३.१२.२०२२ | भा.द.वि.कलम ३२६, ३२३ व ५०४ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष | – | – |
| २ | असगर | ३०.११.२ | ०३.१२. | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | साकीरअली खान | ०२२ | २०२२ | | | | |

## भाग "क"

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

### अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार | नाव | पुराव्याचा प्रकार | निशाणी |
|---|---|---|---|
| सा.क्र. १ | आफरीन जावेद शेख | फिर्यादी | १३ |
| सा.क्र.२ | जावेद कट्टू शेख | साक्षीदार | १५ |

### ब. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | १४ | फिर्याद वरील सही |
| ३. | १२ | तडजोड पुरशिस |

## न्या य नि र्ण य

**( पारित दिनांक ०४ जुलै, २०२६ )**

आरोपी क्र.१ व २ हे भा.द.वि., कलम ३२६, ३२३ व ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपाखाली न्यायचौकशीत आहेत.

## सरकार पक्षाच्या खटल्याची थोडक्यात हकीकत की,

२. दिनांक २९.११.२०२२ रोजी संध्याकाळी ०७.३० वाजताच्या दरम्यान मशिदवाली गल्ली, जयभिमनगर नं.०२, कळवा, ठाणे येथे आरोपी यांनी पूर्वीच्या भांडणाचा राग मनात धरून आपसात संगणमत करून फिर्यादीचे पती यांना लाकडी बांबूने खांद्यावर मारून फ्रॅक्चर केले व ठोश्याबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच फिर्यादी हिला विधीसंघर्षीत बालिकेने मारहाण केली. म्हणून तिने वरील आशयाची फिर्याद कळवा पोलीस ठाण्यात नोंदविली.

३. फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरून कळवा पोलीस ठाण्यात गु. र. क्र. ६२७/२०२२ अन्वये भारतीय दंड संहितेचे कलम ३२६, ३२३ व ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हयाची नोंद झाली. सदर गुन्हयाचा तपास सहा. पोलीस निरीक्षक, निलेश कानडे यांच्याकडे सोपवण्यात आला. त्यांनी सदर गुन्हयाचा तपास केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळी जाऊन घटनास्थळाचा पंचनामा केला व साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले. जखमीचे वैदयकिय प्रमाणपत्र हस्तगत केले. तसेच आरोपींना अटक केली. तपासाअंती त्यांनी अंतिम अहवाल न्यायालयात सादर केला.

४. माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरूध्द भारतीय दंड संहिता कलम ३२६, ३२३ व ५०४ सह कलम ३४ अन्वये दोषारोप नि.६ वर नोंदवले. आरोपींचे निवेदन अनुक्रमे नि.क्र.७ व ८ वर नोंदवून त्यांना त्यांचे मातृभाषेत त्यांचेवर ठेवलेले दोषारोप वाचून दाखवण्यात आले. आरोपींनी गुन्हा नाकबूल केला. सबब, खटल्याचे कामकाज चालविण्यात आले.

५. आरोपींविरुध्द सबळ पुरावा न आल्यामुळे त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३१३ (१)(ब) प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

६. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. डी.के. गायकवाड व

आरोपीतर्फे त्याचे वकील श्री. टी.बी. भालेराव यांचा युक्तीवाद ऐकला.

७. खालील मुद्दे माझे अवलोकनात असून त्यांचे निष्कर्ष मी खालील नमूद कारणमिमांसेच्या आधारे नोंदवित आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, आरोपींनी आपसात संगणमत करून फिर्यादी हिचे पतीला लाकडी बांबूने खांद्यावर मारून फ्रॅक्चर करून इच्छापूर्वक मारहाण करून गंभीर जखमी केले आणि त्या अन्वये भा.द.वि., कलम ३२६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला आहे ? | **नकारार्थी.** |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, आरोपींनी आपसात संगणमत करून फिर्यादीचे पती व फिर्यादीला मारहाण करून दुखापत पोहोचविली आणि त्या अन्वये भा.द.वि., कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला आहे ? | **नकारार्थी.** |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, आरोपींनी आपसात संगणमत करून फिर्यादीचे पती व फिर्यादीला शिवीगाळ करून सार्वजनिक ठिकाणी त्यांना गुन्हा करणेकामी उद्युक्त केले आणि त्या अन्वये भा.द.वि., कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला आहे ? | **नकारार्थी.** |
| ४. | आदेश काय? | **आरोपींची निर्दोष मुक्तता केली.** |

# – कारणमिमांसा –

८. अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता खालीलप्रमाणे साक्षीदारास तपासले आहे.

१. फिर्यादी, आफरीन जावेद शेख, अ.सा.क्र.१ म्हणून नि.क्र.१३ वर.

२. साक्षीदार, जावेद कट्टू शेख, अ.सा.क्र.२ म्हणून नि.क्र.१५ वर.

**मुद्दे क्र. १ ते ३ बाबत –**

९. उपरोक्त नमूद मुद्दे हे एकाच घटनेशी संलग्न असल्याने मजकुराची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रात विचारात घेण्यात आलेले आहेत.

१०. प्रस्तुत प्रकरणातील साक्षीदार क्र.१ आफरीन जावेद शेख ही फिर्यादी असून तिने तिच्या पुराव्यात कथन केले आहे की, घटना ही मुलांच्या कारणांवरून झाली होती. घटना ही सन २०२२–२०२३ च्या दरम्यान घडली होती. त्यादिवशी तिचा मुलगा मोहम्मद अली हा नळावर पाणी पित होता. त्यानंतर पुढे काय झाले हे तिला निश्चित आठवत नसल्याचे तिने सांगितले. तिला फिर्याद दाखविण्यात आली त्यावर सही तिची असल्याचे तिने मान्य केले आहे परंतु त्यातील मजकूर तिला माहित नसल्याचे तिने सांगितले. त्याचप्रमाणे तिने तिचे व आरोपीमध्ये न्यायालयाबाहेर आपसी समझोता झाल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे तशी संयुक्त तडजोड पुरशिस नि.क्र.१२ वर दाखल केल्याचे देखील मान्य केले आहे.

११. आरोपींच्या वकीलांनी अ.सा.क्र.१ चा उलटतपास घेतला असता, तिने मान्य केले की, आरोपी व तिच्यामध्ये न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झाली आहे. तिने कथन केले की, त्यांच्यामध्ये कोणताही वाद राहिलेला नाही. त्याचप्रमाणे तिने तिचे व आरोपीमध्ये न्यायालयाबाहेर आपसी समझोता झाल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे

तशी तडजोड पुरशिस नि.क्र.१२ वर दाखल केल्याचे देखील मान्य केले आहे. प्रस्तुत प्रकरणातील साक्षीदार क्र.२ जावेद कट्टू शेख हे साक्षीदार असून त्यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले आहे की, घटना ही ब–याच वर्षांपूवी घडली होती त्यामुळे त्यांना काही आठवत नसल्याचे सांगितले.

१२. फिर्यादी व साक्षीदारा क्र.२ च्या पुराव्यावरुन असे निदर्शनास येते की, फिर्यादी व आरोपी यांचेमध्ये आपसी तडजोड झाली आहे. त्यावरुन असे लक्षात येते की, फिर्यादी व आरोपींचे आपआपसात उद्भवलेले वाद समझोत्याने मिटवले आहेत. फिर्यादीने दिलेल्या संयुक्त तडजोड पुरशिसमुळे पुरावा दखलपात्र नसल्याचे या न्यायालयाचे मत आहे. तथापि, साक्षीदाराचा पुरावा थोडक्यात येथे लक्षात घेणे आवश्यक आहे.

१३. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला असता दोन्ही पक्षांनी केवळ अभिलेखावर आलेल्या पुराव्याचा ऊहापोह करुन आपआपल्या पक्षात युक्तीवाद केला असल्याचे दिसून येते. तथापि, फिर्यादी व आरोपीने दिलेल्या संयुक्त तडजोड पुरशिसवरुन दोन्ही पक्षांचा युक्तीवाद सखोलरित्या लक्षात घेणे गरजेचे नाही असे या न्यायालयाचे मत आहे.

१४. एकंदरीतच प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती, पुरावा आणि दोन्ही पक्षांचा युक्तीवाद लक्षात घेतला असता आरोपींविरुध्द अभियोगपक्षाने सर्व संशयाचे पलीकडे गुन्हा सिध्द केला असल्याचे दिसून येत नाही. आरोपी व फिर्यादी यांनी त्यांच्यात आपसी तडजोड झाली असल्याची पुरशिस नि.१२ वर दाखल केलेली आहे. यावरून असे दिसून येते की, फिर्यादी व आरोपी यांच्यात समझोता झालेला आहे. फिर्यादीचे पुराव्यात आरोपींविरुध्द कोणतेही गुन्हा दर्शक विधान आलेले नसून आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द होत नाही. त्यामुळे आरोपींनी फिर्यादीचा मानसिक व शारिरीक छळ केला व फसवणूक केली ही बाब निःसंशयपणे सिध्द होत नाही. त्यामुळे हे न्यायालय मुद्दे क्र.१ ते

३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.४ बाबत –</u>**

१५. मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविल्याने आरोपी हे भारतीय दंड विधान कलम ३२६, ३२३ व ५०४ सह कलम ३४ मधून निर्दोषमुक्त होण्यास पात्र आहेत. या अनुषंगाने मी मुद्दा क्र.४ करीता खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१ व २ यांची फौजदारी प्रकिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता,१८६० चे कलम ३२६, ३२३ व ५०४ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याच्या आरोपांतून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे जातमुचलके व जामीनकदबे रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ चे पुर्ततेकरीता रक्कम रुपये १५,०००/– चे नवीन जामीन देणेचे आहे.

४. जप्त मुद्देमाल दोषारोपपत्रामध्ये नमूद असल्याप्रमाणे एक लाकडी बांबू व एक चाकू मुल्यहीन असल्याकारणाने ते अपिल कालावधीनंतर नष्ट करण्याची यावे.

***(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केले.)***

GAYATRI MANGESH GUNTHE

Digitally signed by GAYATRI MANGESH GUNTHE
Date: 2026.07.04 17:01:26 +0530

ठिकाणः ठाणे **(जी.एम. गुंठे)**

दिनांकः–०४.०७.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

(न्यायलय क्र.५), ठाणे.